जमिनीच्या वादातून शेतकरी दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला; एकाचा मृत्यू

वृत्तसंस्था

कोल्हापूर, दि. ८ – शेतीच्या वादातून नंदगाव (ता. करवीर) येथे बुधवारी दुपारी दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. यातील जखमी शेतकरी फकरुद्दीन बाबासो मुजावर (वय ४५) यांचा गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान सीपीआरमध्ये मृत्यू झाला. याप्रकरणी संदीप बाळू चौगुले (वय ३८), त्याचा भाऊ सागर आणि वडील बाळू दादू चौगुले (सर्व रा. नंदगाव) यांच्यावर इस्पुर्ली पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. इस्पुर्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नंदगाव येथे राहणारे मुजावर व चौगुले कुटुंबात शेतजमिनीचा वाद सुरू आहे. बुधवारी सकाळी फकरुद्दीन शेख, त्यांची पत्नी तबस्सुम, भाऊ जिशान, चुलत भाऊ निहाल, चुलती जमिला असे सर्वजण शेतात ऊसाची लागवड करण्यासाठी गेले होते.

यावेळी चौगुले कुटुंबीयांनी त्यांच्याशी वाद घालून या शेतात का आलात? अशी विचारणा केली. संशयितांनी काठी आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याने फकरुद्दीन मुजावर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांना उपचारासाठी छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात दाखल केले होते. प्रथमोपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. मारहाण करणारा संदीप बाळू चौगुले (वय ३८) याला पोलिसांनी अटक केली. सहायक पोलीस निरीक्षक सरोजिनी चव्हाण अधिक तपास करीत आहेत.

दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या १० दरोडेखोरांना अटक

वृत्तसंस्था

नागपूर, दि. ८ – नागपूर येथील वाठोडा चौकाजवळील पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या १० दरोडेखोरांना गुन्हे शाखा पोलिसांच्या युनिट क्रमांक ४ च्या पथकाने मोठ्या शिताफीने अटक केली. त्यांच्याजवळून घातक शस्त्रे जप्त करण्यात आली आहे. या कारवाईने होणारी मोठी दुर्घटना टळली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहनिस उर्फ बबलू खुजली रफीक शेख याच्यावर १३ गंभीर गुन्हे दाखल असून सदर आरोपी हा हद्दपार होता. इमरान उर्फ अरमान रौफ खान याच्याविरुद्ध ८ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

गौरव मानमोडे, सुगत उर्फ धम्मदीप बागडे याच्याविरुद्ध दोन गुन्ह्यांसह ५ गंभीर गुन्हे आहेत. अमर महाले याच्यावर दुखापतीचे ६ गुन्हे दाखल आहेत. तुषार डहाके याच्यावर जबरी चोरीच्या गुन्ह्यासह एकूण ४ गुन्हे आहेत. विजय चन्ने याच्यावर दरोड्याच्या ४ गुन्ह्यासह एकूण १९ गुन्ह्यांची नोंद असून यापूर्वी हद्दपार करण्यात आले आहे.

रंजित धनावत याच्यावर खंडणी, जबरी चोरीच्या गुन्ह्यासह एकूण २० गुन्हे आहेत. तो सध्या हद्दपार आहे. समीर उर्फ अजय चौरसिया याच्याविरुद्ध अपहरण, बलात्काराचे ३ गंभीर गुन्ह्यांसह ६ गुन्हे आहेत.

विकास उर्फ सन्नी वर्मा हा कुख्यात गुंड संतोष आंबेकर याचा भाचा असून तो नुकताच कारागृहातून बाहेर आला आहे. त्याच्यावर एकूण १३ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी त्याला शहरातून हद्दपारदेखील करण्यात आले होते. लॉकडाऊनच्या पृष्ठभूमीवर भौतिक दूरत्व राखण्यासाठी न्यायालयाच्या आदेशाने कारागृहातील गुन्हेगारांची अटीवर सुटका करण्यात आली. आर्थिक कोंडी होत असल्याने गुन्हेगारीत वाढ होत आहे. चोरी, लूटमारी, दरोडा आणि अत्याचाराचे प्रकरण वाढतच आहेत.

आयएनएस जलाश्व ७०० भारतीय नागरिकांना घेऊन मालदीववरून तुतीकोरीनला पोहोचले

नवी दिल्ली, दि. ८ (वृत्तसंस्था) – भारतीय नौदलाद्वारे ''ऑपरेशन समुद्र सेतू''साठी तैनात आयएनएस जलाश्व ७०० भारतीय नागरिकांना माले, मालदीववरून घेऊन ७ जून रोजी तुतीकोरीन येथे पोहोचले. वंदे भारत मोहिमेअंतर्गत आयएनएस जलाश्वने मालदीव आणि श्रीलंकेहून आतापर्यंत २६७२ भारतीय नागरिकांना भारतात परत आणले आहे.

मालदीवमधील भारतीय दूतावासाच्या मदतीने भारतीय नागरिकांचे नौकारोहण शक्य झाले. आवश्यक वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना जहाजात बसविण्यात आले. सागरी प्रवासादरम्यान कोविड सुरक्षा शिष्टाचारांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले. मायदेशी आलेल्या नागरिकांना तुतीकोरीन येथील स्थानिक अधिकाऱ्यांनी सहाय्य केले आणि जलदगतीने जहाजातून खाली उतरवणे, आरोग्य तपासणी आणि प्रवाशांचे इमिग्रेशन आणि वाहतुकीची व्यवस्था केली.

यासह, भारतीय नौदलाने सध्याच्या साथीच्या काळात मालदीव आणि श्रीलंका येथून भारतात आणलेल्या भारतीय नागरिकांची संख्या २८७४ वर पोहोचली.

आयएल अँड एफएस ट्रान्सपोर्टेशन नेटवर्क्स लिमिटेड

नोंद. का.: दी आयएल अँड एफएस फायनान्शीअल सेंटर, प्लॉट क्र. सी–२२, जी–ब्लॉक, वांद्रे–कुर्ला संकुल, वांद्रे (पू), मुंबई–४०००५१ **दू. क्र.:** +९१ २२ २६५३३३३३ **फॅक्सीमाईल:** +९१ २२ २६५२३९७९, **ईमेल:** itnlinvestor@ilfsindia.com **वेबसाईट:** www.itnlindia.com **सीआयएन:** एल४५२०३एमएच२०००पीएलसी१२९७९०

१९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई–व्होटींगची माहिती

याद्वारे सूचना देण्यांत येते की, एजीएमच्या सूचनेत मांडलेले कामकाज करण्यासाठी कंपनीची एकोणिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, ३० जून, २०२० रोजी दु. ३.०० वा. व्हिडिओ कॉन्फरन्स (''व्हीसी'')/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'') मार्फत होणार आहे. निगम व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या दिनांक ०५ मे, २०२० चे सर्क्युलर सह वाचता दिनांक ८ एप्रिल, २०२० आणि १३ एप्रिल, २०२० ची सर्क्युलर्स (एकत्रित उल्लेख एमसीए सर्क्युलर्स) आणि दिनांक १२ मे, २०२० चे सेबी सर्क्युलर यास अनुसरुन कंपनी/डिपॉझिटरी कडे ज्यांचे ई–मेल ॲड्रेसेस नोंदवले आहेत त्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून एजीएमची सूचना सोमवार, ८ जून, २०२० रोजी सर्व सभासदांना पाठवली आहे. आर्थिक वर्ष २०१८–१९ साठीचा वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.itnlindia.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) ची वेबसाईट: https://www.evoting.nsdl.com वर उपलब्ध असून डाऊनलोड करता येईल.

एजीएमच्या कारणास्तव कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ व्या तरतुदींच्या बाबतीत कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तके बुधवार, २४ जून, २०२० पासून मंगळवार, ३० जून, २०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १०८ सह वाचता वेळोवेळी सुधारित कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ चे रेग्युलेशन ४४ च्या अनुपालनांत सभासदांना एनएसडीएल ने पुरवलेली इलेक्ट्रॉनिक व्होटींग सिस्टीम (ई–व्होटींग) वापरुन एजीएमच्या सूचनेत मांडलेल्या सर्व ठरवांवर त्यांची मते देण्याची सुविधा पुरवली आहे. सभासदांचे मतदान अधिकार २३ जून, २०२० (कट–ऑफ डेट) रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांनी धारण केलेल्या समभागांच्या समप्रमाणांत असतील.

रिमोट ई–व्होटींगचा कालावधी शनिवार, २७ जून, २०२० रोजी (स. ९.०० वा. भा. प्र. वे.) सुरु होऊन सोमवार, २९ जून, २०२० रोजी (सं. ५.०० वा. भा. प्र. वे.) संपेल. ह्या कालावधीत सभासद इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांचे मत देऊ शकतात. त्यानंतर एनएसडीएलकडून रिमोट ई–व्होटींग मॉड्युल निष्क्रिय केलं जाईल. जे सभासद व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएम मध्ये सहभागी होतील आणि ज्यांनी रिमोट ई–व्होटींग द्वारा त्यांची मते दिलेली नसतील व ज्यांना अन्यप्रकारे तसे करण्यास प्रतिबंध केला नसेल ते एजीएम मध्ये रिमोट ई–व्होटींग सिस्टीम द्वारा मतदान करण्यास पात्र असतील.

ज्या सभासदांनी एजीएमच्या आधी रिमोट ई–व्होटींगने त्यांची मते दिलेली असतील ते सुध्दा व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएम मध्ये उपस्थित राहू/सहभागी होऊ शकतात, परंतु ते पुन्हा त्यांची मते देण्यास हक्कदार नसतील.

कोणत्याही व्यक्तीने, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित करुन ती कंपनीची एक सभासद झाली असेल आणि कट–ऑफ डेट रोजीस शेअर्स धारण करत असल्यास ती evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून लॉगीन आयडी व पासवर्ड मिळवू शकते. तथापि जर तो/ती रिमोट ई–व्होटींगसाठी आधीच एनएसडीएल कडे नोंदणीकृत असेल तर तो/ती मते देण्यासाठी त्याचा किंवा तिचा सध्याचा युजर आयडी व पासवर्ड वापरु शकतात.

जर तुम्ही कंपनी/डिपॉझिटरीकडे तुमचा ई–मेल ॲड्रेस नोंदवलेला नसेल तर तुम्ही कृपया ई–व्होटींगकरिता लॉगीन तपशील मिळवण्यासाठी खालील सूचनांचा अवलंब करा.

प्रत्यक्ष धारणा	खालील दस्तावेजांच्या स्कॅन्ड प्रती ई–मेल द्वारा रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट/कंपनी कडे rnt.helpdesk@linkintime.co.in किंवा itnlinvestor@ilfsindia.com येथे पाठवाव्यात ए. भागधारकांचे नाव, फोलिओ क्र. आणि संपूर्ण पत्ता नमूद केलेले स्वाक्षरी केलेले विनंती पत्र, बी. शेअर प्रमाणपत्राची (पुढील आणि मागील) स्कॅन्ड प्रत आणि सी. पॅन कार्ड आणि आधार कार्ड ची स्व–साक्षांकित प्रत
डिमॅट धारणा	कृपया तुमच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) शी संपर्क साधा आणि तुमच्या डीपीच्या सल्यानुसार प्रक्रिया अनुसरुन तुमच्या डिमॅट खात्यांत तुमचा ई–मेल ॲड्रेस नोंदवावा.

रिमोट ई–व्होटींग शी संबंधित तपशीलांकरिता कृपया, एजीएमची सूचना पाहा. जर तुम्हाला रिमोट ई–व्होटींग बाबत कोणतीही चौकशी करायची असल्यास, कृपया www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शन येथे उपलब्ध भागधारकांसाठी फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्युज) आणि ई–व्होटींग युजर मॅन्युअल पाहावे किंवा टोल फ्रि क्र. १८००–२२२–९९० वर संपर्क साधावा किंवा evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवावी. ई–व्होटींग संबंधातील कोणत्याही तक्रारीच्या बाबतीत कृपया, श्रीमती पल्लवी म्हात्रे, मॅनेजर, एनएसडीएल शी ई–मेल: evoting@nsdl.co.in/pallavid@nsdl.co.in किंवा दू.: ९१ २२ २४९९ ४५४५/१८००–२२२–९९० वर संपर्क साधावा.

एजीएम चे तपशील कंपनीची वेबसाईट www.itnlindia.com, एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com, बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com येथे उपलब्ध आहेत.

आयएल अँड एफएस ट्रान्सपोर्टेशन नेटवर्क्स लिमिटेड साठी
सही/–
कृष्णा घाग
कंपनी सेक्रेटरी

मुंबई, ८ जून, २०२०

EBIXCASH

एबिक्सकॅश वर्ल्ड मनी इंडिया लिमिटेड

(पूर्वीची वैझमॅन फोरेक्स लिमिटेड)
सीआयएन:एल६५९९०एमएच१९८५पीएलसी०३७६९७
नों. कार्यालय: फोर्बस बिल्डिंग, तळ मजला, चरणजीतराय मार्ग, फोर्ट, मुंबई–४०० ००१.
कॉर्पोरेट कार्यालय : २ रा मजला, माणेक प्लाझा, कलिना, सीएसटी रोड, विद्यानगरी मार्ग, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०० ०९८. दू.: +९१–२२–६२८८१५००. ई–मेल : investorsgrievance@weizmannforex.com
वेबसाईट : www.weizmannforex.com/www.indiaforexonilne.com

सूचना
(कंपनीच्या समभागधारकांच्या माहितीसाठी)

इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड ऑथॉरिटी (''आयईपीएफ ऑथॉरिटी'') कडे समभागांचे अनिवार्य हस्तांतरण आणि कंपनीकडे ई–मेल आयडीज नोंदवणे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ (''अधिनियम'') चे कलम १२४(६) सह वाचता वेळोवेळी सुधारित इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड ऑथॉरिटी ला अनुसरून सलग सात किंवा जास्त वर्षे कालावधीसाठी ज्यांच्या संबंधातील लाभांश दावा न करता पडून आहे ते सर्व समभाग भारत सरकारने स्थापन केलेल्या इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ ऑथॉरिटी) कडे कंपनीने हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

भारतामधील कोविड–१९ साथीचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन कंपनीला रुल्सनुसार ज्यांनी आ.व. २०१२–१३ पासून सलग सात (७२ वर्षे लाभांशावर दावा केलेला नाही त्या सर्व भागधारकांना वैयक्तिकरित्या सूचना पाठवणे शक्य झालेले नाही. अन्य बाबींसह त्यांना त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशाचे तपशील पुरवून आयईपीएफ ऑथॉरिटीच्या डिमॅट खात्यात त्यांच्या शेअर्सचे होणारे हस्तांतरण टाळण्याकरिता दावा न केलेल्या लाभांशावर दावा करण्याची एक संधी त्यांना देणारी सूचना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर परिस्थिती सामान्य झाल्यावर कंपनी उपरोक्त भागधारकांना लवकरात लवकर पाठवेल.

ज्यांनी त्यांचे ई–मेल ॲड्रेसेस कंपनी किंवा डिपॉझिटरी/डिपॉझिटरी पार्टिसिपंटसकडे नोंदवले असतील त्या सर्व भागधारकांना कंपनीने ई–मेलद्वारा सूचना पाठवाली आहे.

कंपनीने असे भागधारक आणि त्यांचे फोलिओ क्र. किंवा डीपी आयडी–कलांयेट आयडी तपशिलांसह हस्तांतरणासाठी पात्र ठरवलेल्या त्यांच्या समभागांचे तपशील तिच्या वेबसाईटवर www.weizmannforex.com/www.indiaforexonilne.com वर अपलोड केले आहेत. आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित होण्यास पात्र ठरलेल्या समभागांचे तपशील पडताळण्याकरिता भागधारकांनी कृपा करून वेबसाईटला भेट द्यावी.

जर १० सप्टेंबर, २०२० पूर्वी कंपनीला संबंधित भागधारकांकडून कोणताही वैध दावा प्राप्त झाला नाही तर, खाली संक्षेपात दिलेल्या रुल्स मध्ये सांगितलेल्या नियत प्रक्रियेचा अवलंब करून पुढे कोणतीही सूचना न देता नियमत तारखेपर्यंत कंपनी आयईपीएफ ऑथॉरिटीकडे शेअर्स हस्तांतरित करेल.

I) प्रत्यक्ष पद्धतीने शेअर्स धारण केले असल्यास : कंपनी मूळ शेअर प्रमाणपत्रांच्या बदल्यांत नक्कल शेअर प्रमाणपत्रे जारी करेल आणि आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित करण्यासाठी त्यांना डिमॅट स्वरुपात रुपांतरित करेल. असे जारी केल्यानंतर, मूळ शेअर प्रमाणपत्रे आपोआप रद्द ठरली आणि त्यानंतर ती अपराक्रम्य असल्याचे समजले जाईल.

II) डिमॅट पद्धतीने शेअर्स धारण केले असल्यास : कॉर्पोरेट ॲक्शनच्या माध्यमातून शेअर्स आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित केले जातील.

कृपया ध्यानात ठेवावे की, अशा शेअर्सवर जर कोणतेही लाभ उपार्जित झाले तर ते सर्व भविष्यातील लाभ, लाभांश आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित होतील.

हे सुद्धा ध्यानात ठेवावे की, रुल्स नुसार आयईपीएफ ऑथॉरिटीच्या खात्यात हस्तांतरित झालेल्या शेअर्सच्या संबंधात कंपनीविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही.

भागधारकांनी पुढे ध्यानात ठेवावे की, ही सूचना आणि कंपनीने तिच्या वेबसाईटवर अपलोड केलेले तपशील म्हणजे रुल्सनुसार आयईपीएफ ऑथॉरिटीकडे शेअर्स हस्तांतरित करण्याकरिता कंपनीकडून नक्कल शेअर प्रमाणपत्रे जारी केली जाण्याबाबत दिलेली पर्याप्त सूचना समजावी.

तुम्ही हे समजून घेताना दिलासा मिळेल की, रुल्स अंतर्गत विहित प्रक्रिया अनुसरून अशा शेअर्सवरील उपार्जित लाभांसह आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित समभाग आयईपीएफ ऑथॉरिटीकडून परत मागता येतील. आयईपीएफ ऑथॉरिटीची वेबसाईट www.iepf.gov.in वर रुल्स उपलब्ध आहेत.

कंपनीला तिचा वार्षिक अहवाल, सूचना आणि कोणताही पत्रव्यवहार तिच्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवणे शक्य व्हावे म्हणून ज्या भागधारकांनी अजूनपर्यंत त्यांचे ई–मेल ॲड्रेस नोंदवले नसतील त्यांनी खालील प्रक्रिया अनुसरून त्यांचे ई–मेल ॲड्रेसेस नोंदवावेत.

(i) ई–मेल ॲड्रेसची तात्पुरती नोंदणी भागधारक लिंक : https://bigshareonline.com/Investorregistration.aspx वर क्लीक करून त्यानंतर मार्गदर्शन केल्याप्रमाणेची नोंदणी प्रक्रिया अनुसरून कंपनीचे आरटीए, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे, त्यांचे ई–मेल तात्पुरते नोंदवू शकतात. ई–मेल यशस्वीपणे नोंदवल्यानंतर सभासदांना त्यांच्या ई–मेल आयडीवर त्याची पुष्टी केलेली मिळेल. कोणत्याही चौकशी करिता, सभासद वेबसाईट https://bigshareonline.com मार्फत संपर्क साधू शकतात.

(ii) ई–मेल ॲड्रेसची स्थायी नोंदणी : भागधारक त्यांचे ई–मेल ॲड्रेस, इलेक्ट्रॉनिक धारणाच्या संबंधात डिपॉझिटरीकडे संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटसच्या मार्फत आणि प्रत्यक्ष धारणाच्या संबंधात कंपनीचे रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्स्फर एजंट, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे नोंदवू शकतात.

ह्या बाबतीत तुम्हाला काही चौकशी करायची असेल किंवा कोणतेही सहाय्य हवे असेल तर, कृपया कंपनीच्या रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्स्फर एजंटना खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

बिगशेअस सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, युनिट : एबिक्सकॅश वर्ल्ड मनी इंडिया लिमिटेड (पूर्वीची वैझमॅन फोरेक्स लिमिटेड), १ला मजला, भारत टीन वर्क्स बिल्डिंग, वसंत ओअँसिस समोर, मकवाना रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०५९, संपर्क क्र. : ०२२–६२६३८२००/२२२/२२३ ई–मेल : investor@bigshareonline.com

एबिक्सकॅश वर्ल्ड मनी इंडिया लिमिटेडसाठी
(पूर्वीची वैझमॅन फोरेक्स लिमिटेड)
सही/–
सुषमा कदम
कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०८/०६/२०२०

अस्वीकृती

ह्या वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या कोणत्याही जाहिरातीमध्ये करण्यांत आलेल्या दाव्यांच्या खरेपणा किंवा सत्यतेसाठी नवशक्ति कोणतीही हमी देत नाही. अशा जाहिरातींवर कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी स्वतः चौकशी करण्याचे किंवा तज्ञांचा सल्ला घेण्याबाबत वाचकांना सूचवण्यांत येते. ह्या वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या किंवा अधिकृत वेबसाईटवर ई पेपर मध्ये अपलोड केलेल्या कोणत्याही जाहिरातीमधील कोणत्याही तथाकथित दिशाभूल करणाऱ्या किंवा बदनामीकारक मजुकरासाठी किंवा त्यामधील दाव्यांसाठी भारतात किंवा परदेशातील कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी विधी न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात नवशक्तिच्या मुद्रक, प्रकाशक, संपादक आणि प्रोप्रायटर यांना जबाबदार धरता येणार नाही. ते दायित्व सर्वस्वी जाहिरातदारांचे असेल ज्यामध्ये नवशक्तिची कोणतीही भूमिका असणार नाही.

नोटीस

मी श्रीमती प्रमिला अशोक सावे, राहणार सदनिका क्र. १ड/१४, इमारत क्र. ६२, धवलगिरी नागरी निवारा सह. गृह. संस्था मर्या. प्लॉट नं. १ व २, जन. ए. के. वैद्य मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०० ०६५.

सदर सदनिका मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तांतरित करणेकरिता परवानगी मिळाली असून सदर सदनिकेची दस्त नोंदणी व मुद्रांक शुल्क भरणा करायचा आहे.

तरी या संदर्भात कोणाची हरकत किंवा दावा असल्यास वरील पत्त्यावर ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा.

जीई पॉवर इंडिया लिमिटेड

सीआयएन : एल७४१४०एमएच१९९२पीएलसी०६८३७९
नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. २११–२१२, दुसरा मजला, कॅपिटल जी ब्लॉक, प्लॉट क्र. सी–७०, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई–४०० ०५१, फोन क्र. ९१ २२ ४५४०७२००, वेबसाईट : www.ge.com/in/ge-power-india-limited

सूचना

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंडाकडे कंपनीच्या समभागांचे हस्तांतर आवश्यक

कंपनी अधिनियम, २०१३ (''अधिनियम'') चे कलम १२४ सहवाचता वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड ॲथॉरिटी (अकाऊंटींग, ऑडिट, ट्रान्सफर ॲण्ड रिफंड) रुल्स २०१६ (''रुल्स'') आणि काही असल्यास अधिनियमाच्या इतर प्रयोज्य तरतुदींनुसार सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनी इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड ॲथॉरिटी (''आयईपीएफ'') च्या डिमॅट खात्यामध्ये सात (७) क्रमवार वर्षाकरिता दावारहित राहिलेल्या लाभांशाच्या संदर्भातील समभाग जमा करणार आहे.

कोविड–१९ च्या परिस्थितीत काही सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ न शकल्यामुळे कंपनी ०५ सप्टेंबर, २०२० रोजी किंवा पूर्वी त्याच दावा करण्यासाठी वित्तीय वर्ष २०१२–१३ पासून लाभांशाचा दावा न केलेल्यांना त्यांच्या सध्याच्या उपलब्ध पत्त्यावर प्रत्येक समभाग भागधारक स्मरणपत्र पाठविण्याच्या प्रक्रियेत आहे. अशा भागधारकांच्या संपूर्ण तपशीलासह त्यांचे नाव, फोलिओ नंबर किंवा डीपी आयडी, क्लायंट आयडी आणि हस्तांतरणासाठी नियत समभागांची संख्या कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.ge.com/in/ge-power-india-limited वर उपलब्ध आहे. समभाग धारकांना आयईपीएफ कडे हस्तांतरित होण्याचा संभव असलेल्या त्यांच्या समभागांचा तपशील पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

०५ सप्टेंबर, २०२० पर्यंत अशा समभाग धारकांकडून कोणताही पत्रव्यवहार प्राप्त न झाल्यास कंपनी रुल्सच्या अनुपालनामध्ये आयईपीएफच्या डिमॅट खात्यामध्ये समभागांचे हस्तांतर करेल. प्रत्यक्ष स्वरुपात समभाग धारण केलेले आणि ज्यांचे समभाग हस्तांतरित होण्याचा संभव आहे त्या संबंधित समभाग धारकांनी नोंद घ्यावी की, कंपनी रुल्सनुसार आयईपीएफच्या डिमॅट खात्यामध्ये समभाग हस्तांतर करण्यासाठी त्यांनी धारण केलेले प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करेल आणि अशा प्रकारे जारी केल्यानंतर मूळ समभाग प्रमाणपत्र जे त्यांच्या नावे नोंदणीकृत आहे ते आपोआप रद्द होईल आणि वाटाघाटी योग्य नसल्याचे मानण्यात येईल.

समभाग धारकांनी पुढे नोंद घ्यावी की, कंपनीने तिच्या वेबसाईटवर अपलोड केलेला तपशील हा आयईपीएफकडे प्रत्यक्ष समभाग हस्तांतर करण्यासाठी कंपनीद्वारे प्रतिलिपी समभाग प्रमाणपत्र जारी करण्याच्या संदर्भात पुरेशी सूचना मानण्यात यावी.

समभाग धारक रुल्समधील विहित प्रक्रियेचा अवलंब करून काही असल्यास अशा शेअर्सवरील उपार्जित कॉर्पोरेट लाभ आणि दावारहित लाभांश तसेच हस्तांतरित समभाग आयईपीएफ ॲथॉरिटीकडून परत मिळविण्यासाठी दावा करू शकतात. त्यानुसार आयईपीएफ कडे हस्तांतरित दावारहित लाभांश आणि समभागांच्या संदर्भात कंपनीच्या विरोधात दावा करता येतो.

समभाग धारकांना सापेक्ष प्रकरण आणि रुल्स वर कोणतीही चौकशी करायची असल्यास ते कॅफिन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचिबोवली, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानक्रमगुडा, हैदराबाद–५०० ०३२ यांना ०४० ६७१६२२२२ येथे संपर्क किंवा einward.ris@kfintach.com वर ईमेल पाठवू शकता.

जीई पॉवर इंडिया लिमिटेड करिता
सही/–
प्रदीप्ता पुहान
कंपनी सचिव

ठिकाण : नोएडा
दिनांक : ०५ जून, २०२०

TATA
TATA POWER

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड

(कॉर्पोरेट कॉन्ट्रॅक्स डिपार्टमेंट)
दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, स्मार्ट सेंटर ऑफ प्रोक्युरअरमेंट एक्सलन्स, २रा मजला, सहार रिसिव्हिंग स्टेशन, हॉटेल लीला जवळ, सहार एअरपोर्ट रोड, अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०५९, महाराष्ट्र, भारत. (बोर्ड लाईन : ०२२-६७१७३९१७)
सीआयएन : एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७

निविदा आमंत्रण सूचना

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड खालील पॅकेजेसकरिता पात्र विक्रेत्याकडून निविदा मागवित आहे

१) **मानखुर्द महाराष्ट्र येथे ६० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर फाऊंडेशन आणि ब्रंट ऑईल टँकचे बांधकाम (सीसी२एसए०२८)**
२) **अंबरनाथ, महाराष्ट्र येथे ६० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर फाऊंडेशन आणि ब्रंट ऑईल टँकचे बांधकाम (सीसी२०एसए०२९)**
३) **मालाड, मुंबई, महाराष्ट्र येथे ब्रंट ऑईल टँकचे बांधकाम (सीसी२०एसए०३०)**

तपशीलवार एनआयटीकरिता कृपया वेबसाईट **https://www.tatapower.com** येथील निविदा सेक्शनला भेट द्या.
बोली दस्तावेज जारी करण्यासाठी विनंती प्राप्त करण्यासाठी अंतिम तारीख **१७ जून २०२० रोजी दु. ३.०० पर्यंत**

एनकेजीएसबी को– ऑप. बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय : ३६१, ''लक्ष्मी सदन'', व्ही. पी. रोड, गिरगांव, मुंबई–४००००४.
रिकव्हरी डिपार्टमेंट – बिमल अपार्टमेंट, तळमजला, एच. एफ. सोसायटी रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई–४०००६०. दू. क्र. २८३७६८१६, २८३४९६१६, फॅक्स : २८२०३६०३

लिलाव विक्री सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी एनकेजीएसबी को– ऑप. बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी असल्याने सरफैसी ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(४) सहवाचता सिक्युरिटी एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या नियम ६(२)/८(६) अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी खाली वर्णन केलेल्या मत्ता/मिळकतींच्या **''जसे आहे जेथे आहे तत्त्वावर''** आणि **''जसे आहे जे आहे तत्त्वावर''** विक्रीसाठी मोहोरबंद निविदा मागविल्या आहेत.

➢ खालील अटींवर निम्नस्वाक्षरीकारांनी उशिरात उशिरा १७.०७.२०२० रोजीच्या सं. ५.०० पूर्वी मोहोरबंद लिफाफ्यातून प्रस्ताव निमंत्रित केले आहेत. कृपया, खरेदी करावयाच्या मिळकतीचा पत्ता लिफाफ्यावर नमूद करावा. लिलाव १८.०७.२०२० रोजी दिलेल्या क्रमांकानुसार मिळकतीकरिता १/२ मिनिटांच्या मध्यांतराने सकाळी ११.०० वा. भरविण्यात येईल.

कर्जदार/जामीनदार यांची नावे	गहाण मिळकतीचे वर्णन	३१.०५.२०२० रोजी एकूण थकबाकी सह वैधानिक दराने पुढील व्याज	राखीव किंमत	इ.अ.र.	निरीक्षणाची तारीख आणि वेळ
		रक्कम लाखांमध्ये			
१. सौ. मनिषा धनराज राणे २. श्री. धनराज देवराम राणे	सौ. मनिषा धनराज राणे यांच्या मालकीचा फ्लॅट क्र. ए/२०२, २रा मजला, क्षेत्र मोजमापित ६४० चौ. फू. बिल्टअप, राजेश्वरी दीप सीएचएस लि., गणेश मंदिर रोड, नेहरु मैदानाजवळ, डोंबिवली पूर्व, जिल्हा, ठाणे–४२१ २०१.	३३.३३	३५.२०	३.५२	१६/०६/२०२० स. ११:०० ते दु. ०१:०० दरम्यान
१. श्री. संदिप राजाराम